Scan QR code
to visit...
Epaper Portal

दैनिक
www.sahyandrinews.com

सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code
to visit...
Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ४२ • Title - Code :- MAHMAR49513 • सोमवार दि.३० ऑक्टोबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

मुख्यमंत्र्यांवर विश्वास ठेवा! फडणवीस यांचे मराठा आंदोलकांना आवाहनच

मनोज जरांगे-पाटील यांचे मुख्यमंत्री शिंदे यांना निमंत्रण

नागपूर । प्रतिनिधी

मराठा आरक्षणाबाबत मुख्यमंत्री स्वत: लक्ष घालून निर्णय घेतील, असे वक्तव्य उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी केले, तर दुसरीकडे उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्र्यांसह उपमुख्यमंत्र्यांनाही चर्चेला येण्याचे आवाहन केले. त्यामुळे मराठा आरक्षणतिढय़ाच्या केंद्रस्थानी आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आले आहेत.

जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्यावर विश्वास ठेवावा, मराठा आरक्षणाबाबत ते स्वत: लक्ष घालून योग्य निर्णय घेतील, असे वक्तव्य उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी नागपूर येथे प्रसार माध्यमांकडे केले. फडणवीस म्हणाले, की जरांगे पाटील यांच्या तब्येतीची काळजी घेतली पाहिजे. डॉक्टरांचे पथक त्यांच्याबरोबर आहे. जरांगे पाटील यांच्याबरोबर असणाऱ्यांनीही त्यांची काळजी घेण्याची गरज आहे. तर दुसऱ्या बाजुला मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी चर्चेसाठी आंतरवली सराटी येथे यावे, असे खुले आवाहन आंदोलनकर्ते

मनोज जरांगे- पाटील यांनी रविवारी केले. दरम्यान, मराठा समाजास कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसींमध्ये समाविष्ट करण्याच्या मागणीसाठी बेमुदत उपोषणास बसलेल्या जरांगे यांची प्रकृती पाचव्या दिवशी खालावली.किमान पाणी तरी घ्या, असे आवाहन जरांगे यांना रविवारी दूरध्वनीवरून मुख्यमंत्र्यांनी केले होते. त्याचा उल्लेख करून जरांगे म्हणाले, ‘‘मी आतापर्यंत त्यांचा शब्द खाली पडू दिला नाही. परंतु मराठा समाजाच्या लेकराबाळांचा प्रश्न असल्याने आपण पाणी घेऊ शकत नाही. मराठा समाजाने खूप वेदना सहन केल्या आहेत हे ओळखून आता सरकारने त्यांना न्याय द्यावा. माझेही कुटुंब आहे. परंतु, आपण आता अगोदर समाजाचे आहोत. लढाईस जाताना क्षत्रियाने रडायचे नसते तर लढायचे असते. आरक्षण मिळाल्याशिवाय आपण आता मागे हटणार नाही. आता सरकारसमोर दोनच पर्याय आहेत. एक तर आरक्षण द्या किंवा मराठा समाजाच्या शांततेच्या आंदोलनाचा सामना करा.’’जालना जिल्ह्यात शंभरपेक्षा अधिक गावांत साखळी उपोषण चालू आहे. जिल्ह्यातील ३०० पेक्षा अधिक गावांत राजकीय नेत्यांना गावबंदी करण्यात आल्याचे फलक लागले आहेत. जिल्ह्यात अनेक ठिकाणी महिलाही जरांगे यांच्या समर्थनार्थ आंदोलनात उतरल्या आहेत. भोकरदन येथे महिलांनी मोर्चाही काढला. परतूर तालुक्यातील मांडवा देवी परिसरातही महिलांनी उपोषण सुरू केले आहे.

मराठा आरक्षणाबाबत मुख्यमंत्री शिंदे स्वत: योग्य निर्णय घेतील. जरांगे यांनी त्यांच्यावर विश्वास ठेवावा. जरांगे यांच्या तब्येतीची काळजी त्यांच्या सहकाऱ्यांनीही घेतली पाहिजे.– देवेंद्र फडणवीस

मला बोलता येतेय तोपर्यंत चर्चेस या, नंतर काही उपयोग नाही. दोन दिवसांत आरक्षण मिळण्याची शक्यता आरोग्यमंत्री व्यक्त करतात पण मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री ते का सांगत नाहीत?– मनोज जरांगे-पाटील

आलापल्लीत ३७ वर्षीय इसमाचा मृतदेह आढळला

अहेरी पोलिसांकडून तपास सुरू

आलापल्ली । प्रतिनिधी

येथे एका ३७ वर्षीय इसमाचा मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. राकेश फुलचंद कन्नाके (३७) असे मृतकाचे नाव असून टेकडी कॉलनी येथे वास्तव्यास होता.२९ ऑक्टोबर रोजी सकाळच्या सुमारास त्याचा प्रभाग क्रमांक ५ मध्ये मृतदेह आढळला आहे.

सविस्तर वृत्त असे की, अहेरी तालुक्यातील आलापल्ली येथील प्रभाग क्रमांक ५ मध्ये मागील १७ ऑक्टोबर ते २३ ऑक्टोबर पर्यंत साई बाबा देवस्थान सेवा समिती द्वारा या ठिकाणी भागवत सप्ताह सुरू आयोजन करण्यात आले होते. त्यासाठी भव्य पेंडाल बांधण्यात आले.तीन दिवसांपासून याठिकाणी पेंडाल काढण्याचे काम सुरू होते.आज २९ ऑक्टोबर रोजी काही तरुण पेंडाल

काढण्यासाठी आले असता त्यांना सकाळी साडेसात ते आठ वाजताच्या दरम्यान राकेश कन्नाके चा मृतदेह आढळून आला.या घटनेची माहिती मिळताच अहेरीचे पोलीस निरीक्षक मनोज काळबांधे आपला चमू घेऊन घटनास्थळी दाखल झाले.ही माहिती वाऱ्यासारखी पसरली अन नागरिकांनी एकच गर्दी केली.पोलिसांनी घटनास्थळावरून मृतदेह शवविच्छेदनासाठी अहेरी ग्रामीण रुग्णालय येथे पाठविले आहे.सदर इसमाच्या डोक्यावर जखम असल्याची माहिती पोलिसांनी दिली असून एक चप्पल चिखलात अडकून होता तर दुसरा चप्पल अस्तव्यस्त पडून होता.यावरून घातपात असल्याचा संशय बळावला आहे. अहेरी पोलीस मोका पंचनामा करून त्या दिशेने पुढील तपास करीत आहेत.

वाघाच्या हल्ल्यात गुराखी ठार

चिमूर । प्रतिनिधी

दबा धरून बसलेल्या वाघाने हल्ला करून एका गुराख्याला ठार केले. ही घटना २९ ऑक्टोंबर रोज रविवार ला चिमूर तालुक्यातील पळसगाव वनपरिक्षेत्रातर्गत बेलारा येथे दुपारी दोनच्या सुमारास घडली. मधुकर जंगल धाडसे (४९) असे मृत गुराख्याचे नाव आहे. या घटनेने विहिरगाव शेतशिवरात सर्वत्र भीतीचे वातावरण पसरले आहे.

पळसगाव वनपरिक्षेत्रातील विहिरगाव बेलारा पळसगाव या वनपरिक्षेत्रात वाघाचा वावर वाढला आहे. विहीरगाव हे गाव जंगलात वसले आहे. येथील शेतकऱ्यांकडे पशुधन मोठ्या प्रमाणात आहे. त्यावर ते संसाराचा उदरनिर्वाह करतात. गाव जंगलात असल्याने वन्य प्राण्यांची भिती नेहमीच असते. वाघाची दहशत असल्याने गुराख्यांनी जनावरे जंगलात चरायला नेणे बंद केले आहे. त्यामुळे घरची जनावरे स्वत:लाच पाळी पाळीने चरायला न्यावी लागत आहे. विहीरगावात सध्या प्रत्येक दिवशी सहा सहा शेतकऱ्यांची जनावरे चरायला नेण्यासाठी पाळी लावण्यात आली आहे.आज (२९ ऑक्टोंबर)प्रफुल पाटील, सुरेश ढोणे, सुधाकर नन्नावरे, सहादेव रदये, सुभाष बावणे, मधुकर धाडसे आदी पशुपालक तीनशे जनावरे घेऊन गेले होते. सकाळी १० च्या दरम्यान मन्सराम जीवतोडे यांच्या पडीत असलेल्या शेतात जनावरे चरत होती. यावेळी जनावरांना भक्ष्य बनविण्यासाठी वाघ परिसरात दबा धरून बसला होता. जनावरांच्या जवळ असलेला गुराखी मधुकर धाडसे याच्यावर दबा धरून बसलेल्या वाघाने हल्ला केला. त्यानंतर जनावरे ओरडायला लागली. त्यामुळे इतर गुरख्यांनी धाडसे यांना आवाज दिला. परंतु, त्यांनी प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे त्याचा शोध घेतला असता काही अंतरावर नाल्याजवळ वाघाने फरफटत नेल्याच्या खुणा आढळून आल्या. त्यापुढे शोध घेतला असता मृतदेह आढळून आला. शरीरावर ठिकठिकाणी वाघाने हल्ला केल्याच्या खुणा आढळून आल्या.या घटनेची माहिती वन विभागाला दिल्यानंतर त्यांचा ताफा घटनस्थळी पोहोचला. पंचनामा करून मृतदेह चिमूर येथील उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला.

मागण्या पूर्ण होईपर्यंत होमगार्ड महासंघाचा मतदानावर बहिष्कार

माजरी । प्रतिनिधी

राज्यातील होमगार्डच्या विविध मागण्यांसाठी मुंबईतील आझाद मैदानावर २१ ऑगस्टपासून १० दिवस सुरू असलेले उपोषण ३१ ऑगस्ट रोजी जळगावचे आमदार मंगेश चव्हाण यांची मध्यस्थी व मंत्री गिरीश महाजन यांच्याशी फोनद्वारे संपर्क साधत त्यांच्या आश्वासनानंतर सोडण्यात आले. मात्र त्याला आता सव्वा महिना उलटला तरी मागण्यांविषयी घेण्यात येणारी बैठक झाली नाही की मागण्यांचा विचार होत नसल्याने आगामी सर्वच निवडणुकांवेळी मतदानावर बहिष्कार टाकण्याचा इशारा राज्यातील सर्व होमागार्डनी दिला आहे. या संदर्भात डॉ. प्रतापराव मोहिते पाटील, व्यवस्थापक अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य होमगार्ड महासंघ यांच्या वतीने देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार,राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त उरविंदर पाल सिंग, चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., जिल्हा पोलिस अधीक्षक रविंद्र परदेशी यांना निवेदन देण्यात आले आहे.

दरम्यान ३६५ दिवस नियमित रोजगारासह इतर विविध मागण्या होमगार्डकडून केल्या जात आहे. त्यासाठी वेळोवेळी निवेदन देण्यासह आंदोलन करण्यात आले. यात ७६ वर्षांच्या इतिहासात होमगार्ड हा तूटपुंजा मानधनावर सेवा देत आहे, असे होमगार्ड संघटनेचे म्हणणे आहे. होमगार्ड स्वत:वर होणाऱ्या अन्याय अत्याचाराविरोधात तसेच नियमित ३६५ दिवस रोजगार मिळावा, यासाठी ते लढा देत आहे. त्याच पार्श्वभूमीवर सरकारचे लक्ष वेधण्यासाठीच मुंबई येथील आझाद मैदानावर महाराष्ट्र राज्य होमगार्ड महासंघाच्या नेतृत्वात २१ ते २९ ऑगस्ट दरम्यान होमगार्डनी आंदोलन केले होते.त्या वेळी आमदार मंगेश चव्हाण यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन पुढील दहा दिवसात उपमुख्यमंत्री व गृहमंतत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी बोलून संयुक्त भेट घालून होमगार्डना ३६५ दिवस नियमित रोजगारासह इतर २० मागण्यांवर चर्चा करण्यासंदर्भात बैठक आयोजित करण्याचे आश्वासन दिले होते. त्या वेळी त्यांनी ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन यांच्याशी फोनवरदेखील बोलणे करून दिले होते व त्यांनीही बैठक घेण्याविषयी सांगितले होते. त्यामुळे होमगार्डनी त्यांच्या शब्दाला मान देवून उपोषण तात्पुरते स्थगित केले होते. मात्र, एवढे दिवस लोटूनही गृहमंत्र्यांसोबतची बैठक झालेली नाही.होमगार्डसह कुटुंब मतदान करणार नाही मागण्यांसंदर्भात १५ ऑक्टोबरपूर्वी बैठक घ्यावी, अशी मागणी होमगार्डनी केली आहे. बैठक न झाल्यास होमगार्ड बहिष्कार आंदोलन करणार आहे. त्यात राज्यातील ४५ हजार ७२४ होमगार्ड, त्यांचे कुटुंब व मित्र परिवार आगामी सर्वच निवडणुकांवेळी मतदानावर बहिष्कार टाकणार आहे, असा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे.

हा लढा न्याय हक्कासाठी असून, शासनाकडून होमगार्डच्या विविध मागण्या गेल्या अनेक वर्षांपासून दुर्लक्ष केले जात आहे. आतादेखील मागण्यांसंदर्भात लवकरात लवकर बैठक होऊन मागण्या मान्य न झाल्यास आगामी सर्व निवडणुकांवर सहकुटुंब बहिष्कार टाकण्यात येणार आहे. तसेच यापुढे होणारे आंदोलन अधिक तीव्र करू.
– डॉ. प्रतापराव मोहिते पाटील, व्यवस्थापक अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य होमगार्ड महासंघ.

‘मन की बात’ मधून प्रधानमंत्री मोदी यांचा देशवासीयांना स्वदेशीचा आग्रह

भाजपा ओबीसी मोर्चा चंद्रपूर महानगरच्या आयोजनाचा घेतला अनेकांनी लाभ

चंद्रपूर । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ’मन की बात’ कार्यक्रमाच्या प्रक्षेपणाचा कार्यक्रम राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांच्या सुचनावजा मार्गदर्शनात भाजपा ओबीसी मोर्चा चंद्रपूर महानगरच्या वतिने दि. २९ ऑक्टोंबर रोजी मन की बात विश्वकर्मा के साथ या कार्यक्रमाच्या अनुशंगाने आयोजित केला होता. या कार्यक्रमास ओबीसी नेते डॉ. अशोक जिवतोडे, युवा नेते रघुवीर अहीर, भाजपा ओबीसी मोर्चाचे महानगर अध्यक्ष विनोद शेरकी, माजी नगरसेवक राजेंद्र अडपेवार, प्रदीप किरमे, प्रा. रवी जोगी, मधुकर राऊत, मयुर भोकरे, सुरेश भाकरे, गौतम यादव, राम हरणे, बाळू कोलनकर, मुग्धा खांडे, संजय शर्मा, जितू शर्मा यांचेसह अनेकांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आजच्या या संदेशात ’वोकल फॉर लोकल या संकल्पनेवर भर देत स्वदेशी वस्तूंची खरेदी करून देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याचे आवाहन केले. त्यांनी सणासुदीच्या काळात स्वदेशी निर्मित उत्पादनाच्या खरेदीवर भर देवून आपल्या राष्ट्रीय कर्तव्याचे निर्वहण करण्याचे देशवासीयांना आवाहन केले. प्रधानमंत्री मोदीजींनी आपल्या संदेशाद्वारे महात्मा गाधीजींच्या जयंतीदिनी नवी दिल्ली येथे एकाच दुकानातून एकाच दिवशी सुमारे दीड करोड़ खादीच्या वस्त्रांची खरेदी करण्यात आल्याचे सांगत हे फार मोठे राष्ट्रहिताचे कार्य असल्याचे सांगीतले.१० वर्षांपूर्वी ३० करोड रूपयांची खादीची खरेदी आज १.२५ लाख करोड रूपयांच्या आसपास पोहचली असल्याने याचा लाभ शहरांपासून तर गांवापर्यंतच्या वेगवेगळ्या घटकांपर्यंत पोहचला असल्याने विनकर, शेतकरी व या व्यवसायाशी निगडीत लोकांना मोठ्या प्रमाणात लाभ मिळाल्याचे प्रधानमंत्र्यांनी आपल्या संभाषणाद्वारे

मन की बात
विश्वकर्मा
के साथ

सांगीतले. देशातील प्रत्येकांनी खरेदी करतांना स्वदेशी वस्तूंची खरेदी करण्याचा प्रण करावा असे आवाहन करून वोकल फॉर लोकल अभियानास लोकांचे समर्थन वाढत असल्याबाबत समाधान व्यक्त केले. यामुळे देश आत्मनिर्भरते कडे वेगाने वाटचाल करण्यास समर्थ होईल असेही प्रधानमंत्री म्हणाले. ही खरेदी केवळ सणांपुरती मर्यादीत राहू नये अशी अपेक्षा प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केली.या प्रसंगी प्रधानमंत्री मोदीजींनी 'मेरी माटी मेरा देश' या अभियांना अंतर्गत देशाच्या काना कोपऱ्यातून गोळा करण्यात आलेली पवित्र माती, अमृत कलशाद्वारा एकत्रित करण्यात आली असून विविध राज्य व प्रांतातून हा अमृत कलश यात्रेद्वारे दिल्लीत पोहचत असून या ठिकाणी विशाल भारताची ओळख म्हणून पवित्र अमृत वाटीकेचे निर्माण करण्यात येणार आहे असेही त्यांनी सागीतले. दि. ३१ ऑक्टोंबर ही लोह पुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती तर माजी पंतप्रधान इंदीराजी यांची पुण्यतिथी असून या दिवशी राष्ट्रव्यापी संघटनेची आधारशिला मेरा युवा भारत स्थापित होईल या माध्यमातून देशभरातील युवकांसाठी विविध कार्यक्रम आयोजित करून युवकांमध्ये एकजूट निर्माण करण्याचे ध्येय साकार करण्याचा संकल्प असल्याचे प्रधानमंत्र्यांनी आपल्या मन की बात या कार्यक्रमात सांगीतले. त्यांनी आपल्या संदेशातून राष्ट्रोनत्तीच्या कार्यात प्रत्येकांनी आपले योगदान देण्याचे आवाहन करतांनाच अनेक महत्वपुर्ण बाबींवर विस्तारपूर्वक ऊहापोह केला.

संपादकीय

कतारचे आव्हान

भारतीय नौदलातील आठ माजी अधिकाऱ्यांना कतारच्या न्यायालयाने ठोठावलेली मृत्युदंडाची शिक्षा ही भारताच्या परराष्ट्र धोरणाची कसोटी पाहणारी असेल. कतारबरोबर भारताचे मैत्रीपूर्ण संबंध असले आणि उभय देशांतील व्यापारही लक्षणीय असला, तरी पश्चिम आशियाची भू-राजकीय स्थिती सध्या चिघळलेली आहे; इस्रायल आणि हमास यांच्यात सुरू असलेले युद्ध हे त्याचे एक मुख्य कारण.हमासच्या हल्ल्याचा निषेध करतानाच पॅलेस्टाइनला पाठिंबा देण्याचे धोरण स्वीकारून आखाती देशांबाबतच्या आपल्या धोरणात संतुलन आणि सातत्य राखण्याचा प्रयत्न करणाऱ्या भारतासमोर कतारमधील हे प्रकरण एक आव्हान म्हणून उभे ठाकले आहे. या प्रकरणात गुंतलेल्या आठही भारतीयांना गेल्या वर्षीच्या ऑगस्टमध्ये अटक करण्यात आली होती. कतारच्या संरक्षण दलांच्या प्रशिक्षणाचे काम करणाऱ्या ‘अल दाहरा’ या कंपनीत हे आठही जण कार्यरत होते. कतारने त्यांच्यावरील आरोप जाहीर केलेले नाहीत; परंतु हेरगिरीच्या प्रकरणात त्यांना अटक झाल्याचा अंदाज वर्तविला जात आहे. कतार आणि इटली यांच्यातील पाणबुडी प्रकल्पाची संवेदनशील माहिती त्यांनी इस्रायलला पुरविल्याचा संशय त्यांच्यावर असल्याचेही सांगितले जात आहे. कतारचे पश्चिम आशियातील स्थान; तसेच ‘हमास’, ‘मुस्लिम ब्रदरहूड’, ‘तालिबान’ यांसारख्या संघटनांबरोबरील त्याचे संबंध पाहता या आरोपांमधील गांभीर्य लक्षात येईल. या आठही जणांना दूतावासातर्फे संपर्क साधण्याची संधी गेल्या वर्षी देण्यात आली होती. त्याचबरोबर त्यांना त्यांच्या कुटुंबीयांशीही संपर्क साधू दिला होता. तेव्हापासून परराष्ट्र खाते हे प्रकरण हाताळत आहे. त्यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावल्याने या प्रकरणाने आता नवीन वळण घेतले आहे.या प्रकरणी सर्व कायदेशीर पर्यायांचा विचार करीत असल्याची प्रतिक्रिया भारताने दिली असून, ती योग्यच म्हणावी लागेल. मात्र, त्याच्याच जोडीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कतारच्या सर्वोच्च नेतृत्वाशी संवाद साधण्यापासून आंतरराष्ट्रीय समुदायाच्या मदतीपर्यंतच्या अन्य पर्यायांचाही विचार करावा लागेल. भारत आणि कतार यांचे संबंध तसे मैत्रीपूर्ण आहेत. कतारच्या आमिरांनी २०१५मध्ये भारताचा दौरा केला होता. पंतप्रधान मोदींनी त्यानंतरच्या वर्षात कतारला भेट दिली होती. उभय देशांमध्ये पंधरा अब्ज डॉलरपर्यंतचा व्यापार असून, इंधनासाठी भारत कतारवर अवलंबून आहे. इंधन सुरक्षेसाठी कतार भारतासाठी अतिशय महत्त्वाचा ठरतो. दोन्ही देशांमध्ये संरक्षणाबाबतही करार झाले आहेत. कतारमध्ये अनेक भारतीय कंपन्या कार्यरत आहेत. त्यांमधील कामासाठी आणि अन्य रोजगारासाठी सुमारे आठ लाख भारतीय तिथे गेले असून, त्यांच्याकडून भारताला परकी चलन मिळते. आखातातील सहकार परिषदेचा (जीसीसी) कतार सदस्य असून, काश्मीरबाबतची त्याची भूमिका भारतासाठी महत्त्वाची ठरते. संयुक्त राष्ट्रांतील सुरक्षा परिषदेच्या कायमस्वरूपी सदस्यात्वासाठी कतारसारख्या देशाची भारताला मोठी गरज आहे. गेल्या वर्षी भारतात प्रेषितांच्या नामोल्लेखावरून झालेल्या वादानंतर कतारने कठोर भूमिका घेतली होती. त्यावेळी भारतानेही तातडीने कतारचा आदर करून दोषींवर कारवाई करण्याचे पाऊल उचलले होते, ते या सर्व कारणांमुळे. ही पार्श्वभूमी आणि सर्वच आखाती देशांबरोबरील संबंध अधिक दृढ करण्यासाठी भारताने अलीकडच्या काळात घेतलेले विशेष प्रयत्न हे पाहता, आठ भारतीयांच्या मृत्युदंडाचे प्रकरण खूपच काळजीपूर्वक हाताळावे लागेल. यामध्ये परराष्ट्र धोरणाचा कस लागेल, यात शंका नाही.हे प्रकरण कतारसाठी किती संवेदनशील आहे याची कल्पना न्यायालयाने सुनावलेल्या मृत्युदंडाच्या शिक्षेवरून येते. त्यामुळे या संवेदनशीलतेचाही विचार करावा लागेल. इस्रायल आणि हमास युद्धामुळे या प्रकरणाकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहता येऊ शकते. ते लक्षात घेऊन भारताला अधिकच काळजी घ्यावी लागणार आहे. या प्रकरणाकडे त्या चष्म्यातून पाहिले जाणार नाही, यासाठी पावले उचलावी लागतील. शिक्षा झालेल्या सर्व अधिकाऱ्यांच्या कुटुंबीयांनी कतारच्या आमिरांकडे माफीची याचना यापूर्वीच केलेली आहे. कतारच्या न्यायालयाने दिलेल्या निकालातील तपशील पाहून पुढची पावले उचलणार असल्याचे भारताने म्हटले आहे. त्यानुसार कायदेशीर प्रक्रिया होत राहतीलच. मात्र, त्याचबरोबर दोन्ही देशांतील आजवरच्या मधुर संबंधांचा फायदा घेऊन राजनैतिक पातळीवर हे प्रकरण सोडविण्याचाही प्रयत्न करावा लागेल. पंतप्रधान मोदी यांनी विविध आखाती देशांत स्वत:ची एक प्रतिमा निर्माण केली आहे. त्या प्रतिमेचाही उपयोग प्रसंगी भारताला करावा लागेल. आंतरराष्ट्रीय स्तरावरही भारताला याबाबत पाठिंबा मिळवावा लागेल. एकंदरीत हे प्रकरणाने भारतासमोर एक मोठे प्रश्नचिन्हही निर्माण केले आहे. त्याचे उत्तर कसे दिले जाते, हे पहावे लागेल.

सरकारची असंवेदनशीलता.... मराठा आरक्षण.!!

अंतरवा
ता.अंबड
मंगळवार
मराठा समाज महाराष्ट्र

डॉ.गोविंद मस्के
वडवणी

गेल्या अनेक दिवसापासून आपण पाहतोय की मराठा आरक्षणाचा प्रश्न वारंवार समोर येत असताना सुद्धा सरकार त्याकडे मुद्दामहून कानाडोळ करण्याचा प्रयत्न करताना या ठिकाणी दिसून येत आहे . माननीय मनोज जरांगे पाटील यांनी या ठिकाणी आमरण उपोषण केलं त्यावेळेस स्वतः मुख्यमंत्री या ठिकाणी येऊन त्यांनी आमरण उपोषण जरांगे पाटील यांचे सोडवलं त्यानंतर खुद्द सरकारने मुख्यमंत्र्यांनी त्यांच्याकडे तीस दिवसाचा अवधी मागितला त्यावरती जरांगे पाटील यांनी तो दहा दिवस वाढवून ४० दिवसाचा दिला. अगदीच महाराष्ट्र सरकारला दिला तरी सुद्धा चाळीस दिवस होऊन गेल्यानंतर महाराष्ट्र सरकारने दिलेला शब्द पाळण्यास तयार नाही, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि दोन्हीही उपमुख्यमंत्री या जन आंदोलनाला केराची टोपली दाखवण्याचा प्रयत्न या ठिकाणी होताना त्यांच्याकडून दिसून येत आहे स्वतः सरकारनं मनोज जरांगे पाटील आणि मराठा समाजाला यावेळी आरक्षणाचे हमी देऊन तीस दिवसात निकाल लावू अशा प्रकारची हमी दिली होती परंतु आपल्या समोर हा प्रकार घडलेला असून सुद्धा पुन्हा दुसऱ्यांदा मनोज जरांगे पाटील यांना आमरण उपोषणासाठी ते आता बसलेले आहेत आणि त्यांनी अन्न त्याग जलत्याग करून आंदोलनाची तीव्रता आणखी वाढली आहे त्यांच्या सभेला झालेली जागतिक विक्रमाची नोंद आणि त्यांनी पुन्हा महाराष्ट्र मध्ये काढलेले दौरे आणि त्या दौऱ्यामध्ये त्यांना मिळालेला समाजाचा, सर्वच समाजाचा केवळ मराठा नाही तर सर्व समाजाचा मिळवलेला अभुतपुर्व प्रतिसाद यांनी सरकार घाबरून गेल आहे, दोन दोन लाखांच्या तीन-तीन लाखांच्या सभा रात्री बे रात्री अवघ्या पार पडलेल्या संपूर्ण महाराष्ट्राने पाहिलेले आहेत अतिशय सोप्या आणि साध्या पद्धतीने त्यांनी आंदोलन केलं, अहिंसेच्या मार्गाने आंदोलन करीत असताना कुठलाही प्रकारच्या हिंसेला जरांगे पाटलांनी यांनी समर्थन या ठिकाणी केलेल दिसून येत नाही, स्वतंत्र भारताच्या आंदोलनामध्ये महात्मा गांधींनी असहकार आणि अहिंसेच्या माध्यमातून आंदोलन करून या जुलमी इंग्रजांना या देशातून दीडशे वर्षाच्या राजवटीतून हाकलून लावले हा पराक्रम या ठिकाणी गांधींनी केला होता, त्याच पद्धतीने मनोज जरांगे पाटील यांनी हे आंदोलन उभ केलेल आहे गेल्या पन्नास वर्षापासून मराठा आरक्षणाचा प्रश्न प्रलंबित ठेवण्याचे काम या ठिकाणच्या गेंड्याच्या कातडी पांघरलेल्या नेतेमंडळींनी केलेल आहे, त्याचीच प्रचिती या वेळच्या महाराष्ट्र सरकारमध्ये मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री त्यांचे त्रिमूर्ती सरकारच्या माध्यमातून या ठिकाणी सर्व देशाला समाजाला घडून येताना दिसत आहे, हे जन आंदोलन उभारलेल आहे या जन आंदोलनाला न्याय पाहिजे आहे आम्हाला शिक्षणासाठी आणि नोकरीसाठी, आम्हास आमचं सामाजिक जीवनमान उंचवण्यासाठी आरक्षण पाहिजे अशा पद्धतीची जरांगे पाटलांची मागणी असून सुद्धा आणि ३० दिवसांचा दिलेला शब्द देऊन सुद्धा सरकार या शब्दापासून पाठमोरे होत आहे, असं या आपल्याला दिसून येत आहे पुन्हा एकदा जरांगे पाटील यांनी हे आंदोलन उभ केल आहे. आणि त्यांची प्रकृती आता खालावत आहे मुळातच त्यांच्या शरीराची प्रतिकारशक्ती पहिले आंदोलनामुळे आणि महाराष्ट्र दौऱ्यामुळे यामुळे आणखी कमकुवत झालेली आहे, अशात त्यांनी पुन्हा आमरण उपोषणाचा आंदोलनाच शस्त्र बाहेर काढून स्वतः अंतर्वली मध्ये पुन्हा आमरण उपोषण चालू केलेल आहे, त्यांच्या आंदोलनाची सध्या तरी दखल महाराष्ट्र शासन घेताना दिसून येत नाही पण करोडोंच्या लोकांच्या सहभागामुळे आणि सहकार्यामुळे पाठिंबामुळे त्यांच आंदोलन जगामध्ये पोहोचलेल आहे, अशा या निस्वार्थी निश्चिम भावनेने काम करणाऱ्या आणि स्वतः कुठल्याही पदाची प्रलोभनाची अपेक्षा न बाळगणाऱ्या नेत्याला जरी आंदोलनाच्या माध्यमातून त्यांच्या जीवाचं जर काही बरं वाईट झाल, तर याची किंमत महाराष्ट्र सरकारला देशाला नक्कीच चुकवावी लागेल, असं जन माणसामधून बोलण्यात येत आहे अशी जन माणसांच्या मानसिकतेची भावना आज झालेली आपल्याला समाजामध्ये दिसून येत आहे, म्हणून एकदा मराठा समाजाने या मराठवाड्यामध्ये ज्यावेळेस मराठवाडा स्वतंत्र झाला निजामाच्या जाचातुन निजामाच्या जुलूमशाहीतून त्यावेळेस सुद्धा या मराठवाड्यातल्या मराठा समाजाला आणि सर्व समाजांना हे अजूनही निजामशाही विरोधात रजाकरांच्या विरोधात एक जन आंदोलन उभा करावे लागले होते .आणि सशस्त्र क्रांती त्यावेळेस त्यांनी करून रजाकरांना या ठिकाणाहून पळून लावलं होतं त्याचं पद्धतीचं तशाच पद्धतीचे पुन्हा एकदा देश स्वतंत्र झाल्यानंतर ७० वर्षाने या महाराष्ट्रात तसच निजामा सारख गेंड्याच कातडी पांघरलेले सरकार सगळ्यांना अनुभवायला मिळत आहे, या ठिकाणी यांना स्वतःचा फायदा स्वतःचा राजकीय अस्तित्व निर्माण करण्यासाठी यांना या ठिकाणच्या गोरगरीब गरजवंत मराठ्यांचा असो किंवा अन्य समाजाचा असो यांना या पुढार्यांना घेणं देणं राहिलेले नाही ,स्वतःची खळगी भरण्यासाठी गरीब मराठा कुणबी मराठा समाजाच्या पाठीवर लाथ मारण्याची वृत्ती यांची अनेक दिवसापासून दिसून येत आहे केवळ आणि केवळ फसवणूक करायची गरीब कुणबी मराठ्यांच्या पाठीवर लाथ मारायची आणि त्यांच्या भविष्याच्या पिढ्या मातीमध्ये घालण्याचे काम या सरकारने आजपर्यंत केलेले जनमानसाला दिसून येत आहे ,आणि म्हणून जर विषयाच्या माध्यमातून आणि लोक चळवळीच्या माध्यमातून जर हा आरक्षणाचा प्रश्न जर मिटणार नसेल तर पुन्हा एकदा सशस्त्र क्रांती या ठिकाणच्या मुलांना तरुणांना समाजाला करावी लागेल की काय? हा प्रश्न आता समाज सर्व प्रशासनाला आणि समाजाला विचारात आहे, म्हणून आता वेळ आली आहे ती सरकारने सुधारणा करण्याची आणि जर अशा चळवळीला एखाद्या मनोज जरांगे पाटला सारख्या निस्वार्थिनी भावनेने, ध्येयवादी वेडा झालेला माणूस नेतृत्व करीत असेल, आंदोलनाचे नेतृत्व करणारा जर स्वार्थी नसेल गरिबिच्या झोपडीतून आलेला असेल आणि अशा या नेत्यांना संपवण्याचे काम जर सरकारकडून, जर या ठिकाणी कडून येत असेल तर त्याला या ठिकाणची जनता कदापी सहन करणार नाही इतिहास सांगतो की इसवी सन १६ व्या शतकामध्ये फ्रान्सचा राजा १५ वा लुई व सोळावा लुई यांनी गरीब जनतेची अशीच थट्टा केली होती सोळा वा लुई , त्या ठिकाणी दुष्काळ पडलेला असताना त्यांच्या जनतेला म्हणला होता की त्या जनतेला खाण्यासाठी एक रोटी नव्हती भाकरी नव्हती त्यावेळेस राजा आणि आणि राणी जनतेला सांगत होते की गवत खा आणि मरा एक दिवस असा आला की लोकांनी सशस्त्र क्रांती केली आणि सोळाव्या लुईची त्या ठिकाणी त्याच्या सर्व परिवाराची हत्या करण्यात आली हा इतिहास आमच्यासाठी पुढे चालून प्रेरणादायी ठरेल की काय अशी शंका ? याचा जन माणसांमध्ये निर्माण होत आहे आणि म्हणून स्वतःवर जर अन्याय होत असेल आणि अन्याय दूर करण्यासाठी जर पुन्हा एकदा सशस्त्र क्रांतीच करावी लागणार असेल तर आता समाजासमोर पर्याय नाही ?असे जन माणसाच्या भावनेतून लक्षात येत आहे. म्हणून वेळीच्या आधीच महाराष्ट्रातील सरकारने, या देशातील परिस्थिती समाज भावनेची बंधुत्वाची मेड पुन्हा एकदा रोवायची असेल तर महाराष्ट्र सरकारने जरागे पाटलांच्या मागण्या मान्य करून लवकरात लवकर निर्णय घेतला पाहिजे जेणेकरून जरांगे पाटलांची स्वास्थ्य व्यवस्थित राहील नसता हा प्रश्न आता चिघळेल अशी परिस्थिती महाराष्ट्रामध्ये निर्माण झालेली आहे आणि या परिस्थितीला सर्वतोपरी महाराष्ट्र सरकार हे त्रिमूर्ती सरकार आणि या त्रिमूर्ती सरकारमधील मोठमोठे नेते खासदार आमदार हेच जिम्मेदार आहेत असे लक्षात येत आहे !!

संत विचारांचा चक्रवर्ती

वारकरी संप्रदायाचे अध्वर्यू , संताच्या परतत्व विचाराचा सर्वसामान्यांना सुवर्णस्पर्श कीर्तनकार ह.भ.प बाबामहाराज सातारकर यांची प्रणज्योत आज मालवली. देशात आणि विदेशात संताचा विचार लोकप्रिय करणाऱ्या बाबामहाराज सातारकर यांच्यावर प्रा. डॉ. प्रकाश खांडगे यांनी विशेष लेख लिहिला आहे.

प्रा. डॉ. प्रकाश खांडगे: वारकरी संप्रदायाचे अध्वर्यू, संतांच्या परतत्वविचाराचा सर्वसामान्यांना सुवर्णस्पर्श घडविणारे प्रासादिक कीर्तनकार-प्रवचनकार हरिभक्त परायण बाबामहाराज सातारकर यांची प्राणज्योत अखेर आज (२६ ऑक्टोबर) मालवली. बाबामहाराज सातारकर यांनी संतांचा विचार मुखर केला. माझ्या वडिलांची मिराशी मिरविन गा देवा, या संतवचना प्रमाणे बाबामहाराज सातारकर यांनी आपल्या घरची वारकरी संप्रदायाची आणि परमार्थाची परंपरा पुढे चालवली. त्यांच्या मुखातून संत ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी खरोखरच ऐश्वर्यवती झाली. मुंबई दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर त्यांची 'अभंगवाणी' गाजली. त्यांच्या कीर्तनाचा भावार्थ आणि त्यांच्या कीर्तनाचे निरूपण त्यांच्या सुस्वर आवाजात रसाळ वाटत असे. कर्णमधुर वाटत असे. राज्यात, देशात आणि विदेशात त्यांनी संतांचा विचार लोकप्रिय केला.बाबामहाराजांचा जन्म सातारचा. त्यांच्या घराण्यात वारकरी संप्रदायाची तब्बल १३५ वर्षांची परंपरा होती. त्यांच्या वडिलांचं नाव ज्ञानेश्वर दादामहाराज गोरे. ते प्रसिद्ध मृदंगवादक होते. तर बाबामहाराजांच्या मातोश्रीना संतवाङ्मयाची आवड होती. मात्र बाबामहाराजांना परमार्थाचे धड़े दिले ते त्यांच्या दोन चुलत्यांनी- आप्पामहाराज आणि अण्णामहाराज यांनी. बाबामहाराजांचं एस.एस.सी.पर्यंतचं शिक्षण इंग्रजी माध्यमातून झालेलं होतं. तसंच वयाच्या ११व्या वर्षापासूनच त्यांनी पं. पुरेहितबुवा आण आग्रा घराण्याचे लताफत हुसेन खाँसाहेब, असा मान्यवरांकडे शास्त्रीय गायनाचे धडे गिरवले होते. मात्र शास्त्रीय गायन शिकल्यावरही त्यांचा मूळ वारकरी कीर्तनातला रस कमी झाला नाही. उलट वयोपरत्वे तो वाढतच गेला.बाबामहाराज सातारकर यांची कीर्तनशैली अतिशय प्रसन्न होती. अंग हरिरूप करण्याचे सामर्थ्य त्या शैलीमध्ये होते. बाबामहाराज सातारकरांचा आणि माझा किमान ३० वर्षांपासूनचा परिचय. माझेही घराणे वारकरी असल्यामुळे बाबामहाराजांच्या घरी जाणे-येणे व्हायचे. त्यातूनच त्यांच्या कीर्तनाच्या ध्वनिमुद्रिका करण्याची कल्पना मला सुचली आणि त्यातून बाबामहाराजांच्या सुमारे शंभरावर कॅसेट तयार झाल्या. संपूर्ण महाराष्ट्राने त्या मनोभावे ऐकल्या. बाबामहाराज सातारकर यांच्या हरिपाठाच्या कॅसेटने भाविकांना अक्षरशः चिरतंद्रा लागे. बाबामहाराजांच्या कीर्तनाचे वैशिष्ट्य म्हणजे पारंपरिक फडावरच्या चाली. फडावरच्या चालींचे एक वेगळे वैशिष्ट्य असते. बाबामहाराज फडावरच्या चाली जरी गात असत तरी त्या रागदारी थाटात बांधत असत बाबा. त्यामुळे एकाच वेळी ऐकायला रसाळ तरी बुद्धिगम्य असं त्यांचं कीर्तन असे.बाबामहाराजांनी आपल्या वडिलांकडून वादनाचं शिक्षण घेतलं होतं. त्यामुळे त्यांनी लयीचं नेमकं भान होतं. यामुळेच वयाच्या अवघ्या १२व्या वर्षी कीर्तनाला सुरुवात करूनही बाबामहाराजांच्या कीर्तनात पहिल्यापासूनच नेमकेपणा आणि भारदस्तपणा होता. घराण्यात कीर्तन-प्रवचाची परंपरा असल्यामुळे पुढच्या काळात बाबामहाराजांनी तोच मार्ग अनुसरला. कीर्तन-प्रवचन ऐकावं तर ते बाबामहाराजांचं हे समीकरण रूढ झाल्यामुळे संगीताचे संशोधक-अभ्यासक डॉ. अशोक रानडे यांनी त्यांची मुंबई दूरदर्शनवरील ‘प्रतिभा आणि प्रतिमा’ या कार्यक्रमात मुलाखतही घेतली होती. विविध दूरचित्रवाणी वाहिन्या. तसंच मुंबई दूरदर्शनवर त्यांच्या कैवल्याचा पुतळा, ज्ञानाची दिवाळी, तुका झालासे कळस, अनाथांचा नाथ, देवाचिये द्वारी... अशा अनेक प्रवचन मालिका सादर झाल्या.बाबामहाराजांनी कीर्तन-प्रवचनांचे अक्षरशः हजारो कार्यक्रम केले. सोबतच १९८० ते १९९९ या कालावधीत त्यांनी ठिकठिकाणी ज्ञानेश्वरीवर प्रवचने दिली. तर १९९८ ते २००१ या कालावधीत त्यांनी अमृतानुभवावर विवेचन केले. विशेष म्हणजे १९८३ पासून त्यांनी प्रत्येक वर्षी संतांच्या गावी कीर्तन सप्ताह आयोजित करण्याची परंपरा सुरू केली. त्यासाठी भंडारा डोंगर-देहू, त्र्यंबकेश्वर, नेवासे, पैठण, पंढरपूर, पिंपळनेर आदी ठिकाणी त्यांनी कीर्तन सप्ताहांचं आयोजन केलं. तसंच केवळ महाराष्ट्र, भारत एवढ्यापुरतंच त्यांचं कीर्तन-प्रवचन मर्यादित राहिलं नाही. पार लंडन-अमेरिकेत जाऊन तिथेही त्यांनी आपल्या रसाळ वाणीत कीर्तन-प्रवचन केलं आणि तिथल्याही बांधवा त्यांनी आपल्या वारकरी संप्रदायाशी जोडून घेतलं. विशेष म्हणजे केवळ कीर्तन-प्रवचन करून ते थांबले नाहीत. त्यांनी सुमारे १५ लाख व्यक्तींना वारकरी संप्रदायाची दीक्षा दिली आणि त्यांना व्यसनमुक्त केलं. या सामाजिक कामासाठी त्यांनी १९८३ साली ‘श्री. चैतन्य अध्यात्मिक ज्ञान प्रसार संस्थे’ची स्थापना केली.बाबामहाराजांनी साधलेल्या या आध्यात्मिक-सामाजिक उन्नतीसाठी अलीकडेच महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे बाबामहाराज सातारकर यांना 'ज्ञानोबा-तुकाराम' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते. त्यावेळी त्यांच्या पत्नीचे निधन झाल्याने, पुरस्कार जाहीर समारंभात स्वीकारण्यास त्यांनी नम्र नकार दिला होता. त्यामुळे घरी जाऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.

मराठा समाजाच्या मृतदेहावर आरक्षणाचा आदेश सरकार ठेवणार का? सरकारचे मन निर्दयी-ठाकरे

मुंबई-मराठा आरक्षणासाठी अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांचे आमरण उपोषण २५ ऑक्टोबरपासून सुरू आहे. तर आज त्यांच्या आंदोलनाचा पाचवा दिवस आहे. तर राज्यभरातील मराठा बांधव आक्रमक झाला आहे. यानंतर उद्धव ठाकरे यांनी देखील सरकारला धारेवर धरले आहे. आरक्षणासाठी मराठा समाजातील बांधव रोज आत्महत्या करत आहेत. समाजाच्या मृतदेहावर आरक्षणाचा आदेश सरकार ठेवणार आहे काय? असा संतप्त सवाल त्यांनी केला. ते मुंबईत माध्यमांशी बोलत होते.

उद्धव ठाकरे म्हणाले, मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती खालावत आहे. सरकार त्यांच्या जीवाशी खेळण्याचे राजकारण करीत असेल तर महाराष्ट्राच्या सामाजिक एकतेला ते चूड लावत आहेत. मराठा समाज त्यांचा हक्क मागत आहे आणि त्यांना त्यांचा हक्क मिळायला हवा.ओबीसी, आदिवासींसह इतर समाजाच्या हक्कांना धक्का न लावता मराठा, धनगर, समाजाला त्यांचे हक्काचे टिकणारे आरक्षण मिळायला हवे.जरांगे पाटील उपोषण करत आहेत पण आरक्षणासाठी लोक रोज आत्महत्या करत आहेत. समाजाच्या मृतदेहावर आरक्षणाचा आदेश सरकार ठेवणार आहे काय? सरकार मन की बात करत आहे. पण त्यांचे मन निर्दयी आहे. जरांगे पाटील यांचे प्राण वाचवण्याची त्यांची भूमिका दिसत नाही.संजय राऊत आज दौंडच्या दौऱ्यावर असून, त्यांच्या नियोजित दौऱ्यात काही बदल करण्यात आला आहे. संजय राऊत दौंडमध्ये येताच मराठा संघटनेचे कार्यकर्ते आक्रमक झाले. त्यामुळे राऊतांच्या नियोजित दौऱ्यात बदल करण्यात आला आहे.. दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाकडून बाईक रॅलीचं आयोजन करण्यात आले होते. मात्र मराठा संघटनांच्या आक्रमक भूमिकेनंतर बाईक रॅली रद्द करण्यात आली. यावेळी मराठा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी संजय राऊतांविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.मनोज जरांगे यांच्या आंदोलनाचा आज पाचवा दिवस आहे. जरांगे यांनी आवाहन केल्याप्रमाणे आजपासून (२८ ऑक्टोबर) राज्यभरातील गावागावात सुरु असलेल्या साखळी उपोषणाचे आमरण उपोषणामध्ये रूपांतर होणार आहे. जरांगे यांनी पाणी घेऊन आमरण उपोषण करण्याचे आवाहन मराठा आंदोलकांना केले आहे. दरम्यान नियोजन करणाऱ्या आंदोलकांनी तसेच वयोवृद्ध नागरिकांनी आमरण उपोषण करू नये असे आवाहन देखील त्यांनी केले आहे.मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी दुसऱ्या टप्प्यात पुन्हा एकदा आंतरवाली सराटीत उपोषण सुरु केले आहे. त्यांच्या उपोषणाचा आज पाचवा दिवस आहे. त्यामुळे राज्यभरातील मराठा समाजातील बांधव आंतरवाली सराटी गावात गर्दी करतांना पाहायला मिळत आहे. सोबतच परिसरात असलेल्या गावातील गावकरी देखील उपोषणास्थळी येत आहे. आज पाचव्या दिवशी तर सकाळपासूनच नागरिकांनी गर्दी करायला सुरूवात केली.

शासनाने मराठा समाजाचे आरक्षण तात्काळ जाहीर करा–आ.सुरेश धस

आष्टी (प्रतिनिधी)

आगामी काळामध्ये सर्वच लोकप्रतिनिधींना निवडणुकांमध्ये मते मागण्यासाठी जनतेकडे जावे लागणार आहे मराठा समाज आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागला नाही तर आम्ही कोणत्या तोंडाने यांना मते मागणार आहोत ? असा प्रश्न निर्माण होत असल्यामुळे शासनाने विना विलंब मराठा समाजास आरक्षण जाहीर करावे असे प्रतिपादन आ.सुरेश धस यांनी पत्रकार परिषदेमध्ये केले. आष्टी येथील त्यांच्या निवासस्थानी आयोजित पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते ते पुढे म्हणाले की, कोविड सारख्या महामारीच्या काळात देखील मी २४ तास जनतेत राहून काम केले परंतु आता जनतेच्या अपेक्षेप्रमाणे लोकप्रतिनिधी म्हणून जनतेत जाणे अवघड झाले आहे मात्र मराठा आंदोलनामुळे षंढ म्हणून घरात बसण्याची वेळ माझ्यासह सर्वच राजकीय पुढाऱ्यांच्यावर आली आहे ही अत्यंत खेद जनक बाब आहे.

ओबीसी तील छोट्या घटका विषयी मला काही म्हणायचं नाही मात्र आमचे मराठा समाजाचे लोक लोक पंजाबराव देशमुख साहेब यांच्या सांगण्यावरून जे कुणबी झालेले आहेत.ते आम्हाला तीव्र विरोध करत आहेत याच वाईट वाटत आहे.विदर्भातील नेते असलेले तायवाडे यांना त्या भागातील काँग्रेस भाजपा राष्ट्रवादी शिवसेना सर्व पक्षांचे समर्थन आहे परंतु मराठवाड्यातील ९९% मराठा समाज जो आरक्षणापासून वंचित आहे त्यांच्या बाजूने जर मनोज जरांगे पाटील बोलत असल्यामुळेच आम्हालाही त्यांची बाजू घ्यावी लागेल आता शासनाने विना विलंब मराठा समाजाला तातडीने आरक्षण देण्याची

आवश्यकता निर्माण झालेली आहे.कारण सध्याचे पाच दिवसाच्या उपोषणामुळे समाजामध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत आता लोक ऐकून घ्यायला तयार नाहीत. समजून घेण्याचा तर विषय येत नाही आज जरांगे पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांचेशी चर्चची तयारी दर्शवली आहे ही बाब अत्यंत चांगली आहे. उपमुख्यमंत्री,आणि मुख्यमंत्री हे आरक्षणा संबंधी सकारात्मक आहेत. देवेंद्रजी फडणवीस हे मुख्यमंत्री असताना त्यांनी त्यांच्या कालावधीत किमान एस ई बी सी या प्रवर्गातून आरक्षण दिले होते.परंतु सद्यस्थितीत त्यांनाच टार्गेट केलं जातं आहे. परंतु ज्यांनी काहीच केलं नाही ते फक्त या प्रश्नासंबंधी सहानुभूती दाखवत आहेत गेल्या अनेक वर्षात त्यांना हे करता आले असते परंतु त्यांनी काहीही केलेले नाही अशी नाव न घेता त्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली या प्रकाराविषयी वाईट वाटत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले विदर्भातील मराठा समाज हा ९९टक्के कुणबी झालेला आहे तसेच उत्तर महाराष्ट्रातही जवळपास ९५ टक्के कुणबी झालेला आहे कोकणातही बहुतांश कुणबी आहेत पश्चिम महाराष्ट्रातील पाच जिल्ह्यातील सुद्धा ५० टक्के कुणबी झालेले आहेत सर्वाधिक प्रश्न हा मराठवाड्यातील आठ जिल्ह्यातील मराठा समाजाचा असून त्यामुळे १६ टक्के आरक्षणाची मागणी असली तरी काही टक्केवारी कमी झाली तरी चालेल परंतु आता यापुढे वेळ गमावून चालणार नाही आरक्षण जाहीर करणे आता आवश्यक झालेले आहे.त्यामुळे आता विलंब करण्यात अर्थ नाहीनिर्णय तात्काळ घेण्याची विनंती या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून आ.सुरेश धस यांनी केली आहे.

बीड जिल्ह्यातील २४, तासात आरक्षण मागणी साठी दुसरा बळी, सरकार अनेक कित्येक बळीची अपेक्षा करणार?

बीड प्रतिनिधी

काल दि,२८, रोजी गिरवली येथील युवकाने घोषणा देत आपली जीवन यात्रा सपंवली असताच, आज दि,२९, रोजी गोवर्धन हिवरा येथील गंगाभीषन रामराव मोरे, वय,३३, या युवकाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली,राज्यात अनेक दिवसांपासून मराठा आरक्षणासाठी आंदोलने, मोर्चे काढले जात आहेत, उपोषणही केले जात आहे. अनेक वर्षे किती सरकार आले अलन् गेले?, मात्र मराठा समाजाला आरक्षण कधी मिळेल? मराठा समाजातील अजून किती लोकं आत्महत्या करत आपले जीवन संपवून परिवाराला वाऱ्यावर सोडणार आहेत. राजकीय नेते जातीपातीचे राजकारण करत आपल्या पोळ्या भाजत आहेत. दरम्यान, मराठा आंदोलक योद्धा मनोज जरांगे-पाटील एका सभेत राजकीय नेत्यांना गावबंदी करा, असा आदेश मराठा बांधवांना

दिला असून राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये या आदेशाचे पालन देखील करण्यात आले आहे.

राज्य सरकारला मराठा आरक्षणाबाबत ४० दिवसांची मुदत जरांगे-पाटलांनी दिली होती. मात्र ४० दिवस उलटून गेले तरीही राज्य सरकार काहीच करू शकले नाही. यामुळे जरांगेंनी पुन्हा एकदा अंतरवाली सराटी येथे (२५ ऑक्टोबर) उपोषण सुरू केले आहे. यावेळी उपोषणाच्या दिवशी जरांगेंना भाजप नेते गिरीश महाजन यांचा फोन आला होता. ते जरांगेंना उपोषण न करण्याचा आग्रह करत होते. मात्र जरांगेंनी त्यांचे ऐकले नसून पुन्हा उपोषणास सुरूवात केली. राजकीय नेते निवडणुकांच्या तोंडावर आरक्षण, जातीपातीचे राजकारण करतात. अनेक वर्षांपासून मराठा समाज आपल्या आरक्षणासाठी मोर्चे, आंदोलने करतात, मात्र मराठा समाजाला कोणतेच सरकार आरक्षण देत नाही. निवडणुकांचा वेध घेऊन फक्त आरक्षण देण्याचे आश्वासन देतात. यासाठी आता राजकीय नेत्यांना राज्यातील काही गावात मराठा आरक्षण मिळत नाही तोवर राजकीय नेत्यांना गावात प्रवेश करण्यासाठी बंदी घालण्यात आली.सरकार झोपेतून किती बळी गेल्यावर जागे होणार!

बीडमध्ये मराठा आरक्षण आंदोलनाला हिंसक वळण:एसटी बसच्या काचा फोडत केली दगडफेक

बीड–मराठा आरक्षणासाठी ठिकठिकाणी आंदोलन सुरू आहे. शांततेने आंदोलन करा असे आवाहन मनोज जरांगे पाटलांनी सर्व आंदोलकांना केले आहे. मात्र तरीही आज बिडमध्ये सुरू असलेल्या आंदोलनाला हिंसक वळण लागले आहे. आंदोलकांकडून बीड-कल्याण बसवर तुफान दगडफेक करण्यात आली आहे.

बीडमध्ये पुन्हा एकदा मराठा आरक्षणाच्या आंदोलनाला हिंसक वळण लागले आहे. रात्रीच बीड कोल्हापूर बस पेटवून दिली असताना आज पुन्हा एकदा बीड कल्याण बसवर तुफान दगडफेक करत एसटी बस फोडण्यात आली आहे. बीडच्या सराटा गाव परिसरात ही घटना घडली असून मराठा आंदोलक बस फोडून घटनास्थळावरून निघून गेले. दरम्यान मराठा आरक्षणाच्या आंदोलनाला पुन्हा एकदा हिंसक वळण लागल्याने

प्रशासनाची मात्र धावपळ होताना पाहायला मिळत आहे.बीड जिल्ह्यामध्ये मराठा आरक्षणासाठी आता हिंसक वळण लागले आहे. काल बीड जिल्ह्यात शिंदे समिती दाखल झाली होती. मात्र यावर मराठा आंदोलन हे नाराज ही पाहायला मिळाले. काळे वस्त्र परिधान करून या समितीचा निषेध करण्यात आला होता. मात्र त्यानंतर रात्री बीडच्या दोन वेगवेगळ्या भागात आंदोलन हे हिंसक झाल्याचे पाहायला मिळालं. यात बीडच्या बायपास रोडला टायर जाळून आंदोलने घोषणाबाजी करत सरकार विरोधात घोषणा दिल्या गेल्या तर दुसरीकडे धुळे सोलापूर मार्गावर प्रवासी घेऊन जात असलेली बसची तोडफोड करून आंदोलकांनी जाळली. यानंतर रात्री बसेस बंद करण्यात आल्या होत्या. मात्र पुन्हा एकदा सकाळी बस चालू होताच आंदोलकांनी बीडच्या सराटा फाटा रोडला कल्याण गाडीवर मोठ्या प्रमाणात दगडफेक करत या गाडीचं नुकसान केले. यावेळी जोरदार घोषणाबाजी करत आंदोलन करण्यात आले. आंदोलक हिंसक भूमिका घेत असल्याने पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी लाल परी जोपर्यंत पुढील आदेश येत नाही तोपर्यंत बंद ठेवण्यात आदेश दिले आहेत

वाळुंज अत्याचार प्रकरणी आरोपींना तात्काळ अटक करा–ॲड.आंबेडकर

तीन दिवसात आरोपींना अटक करणार – पोलीस प्रशासनाचे आश्वासन

आष्टी(प्रतिनिधी)

महिलावरील अत्याचाराचे प्रमाण महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात वाढले आहे याच अनुषंगाने आष्टी तालुक्यातील वाळुंज येथील आदिवासी समाजाच्या महिलेवर जो काही कथित अत्याचार झाला त्यांतील दोषी आरोपींना पोलिसांनी तात्काळ अटक करून कारवाई करावी असे प्रतिपादन वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ड प्रकाश आंबेडकर यांनी आष्टी येथे केले.

तालुक्यातील वाळुंज येथील जमिनीवर ताबा सांगितल्याने झालेल्या वादातून महिलेचा विवस्त्र केलेला व्हिडिओ व्हायरल झाला याप्रकरणी भाजपचे आमदार सुरेश धस यांच्या पत्नी प्राजक्ता धस,रघू पवार,राहुल जगदाळे यांच्यावर ट्रासिटी व विनयभंगाचा व इतर गुन्हे दाखल करण्यात आले आहे.या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ड प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली वंचित बहुजन आघाडीच्या वतीने शनिवार दि.२८ ऑक्टोंबर रोजी दुपारी १ वाजता आष्टी शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकातून रॅली काढून जोरदार घोषणाबाजी करत डीवायएसपी कार्यालयाला पर्यंत रॅली काढून पोलिस उपविभागीय अधिकारी कार्यालयाला टाळे ठोको आंदोलनांचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालयात ड प्रकाश आंबेडकर यांनी जाऊन अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर,पोलिस उपविभागीय अधिकारी अभिजित धाराशिवकर यांच्याशी सदरील घटनेविषयी सविस्तर चर्चा केली तीन दिवसांत सदरील आरोपींना अटक करून कारवाई करण्याचे आश्वासन पोलिस प्रशासनाच्या वतीने दिले.त्यानंतर पोलिस उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर यावेळी बोलताना ड प्रकाश आंबेडकर म्हणाले की भाजपच्या आमदारांनी काहीही

केले तरी कारवाई होत नाही सध्या राज्यात भाजपचे सरकार आहे भाजपामुळे मनस्मृतीचे राज्य आले का काय अशी शंका वाटते.तर महिला संदर्भातील अत्याचाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढले आहे अशा प्रकरणातील जे दोषी आरोपी आहे त्यांना पकडा अटक करा सुप्रीम कोर्टाचे आदेश आहेत. अशा प्रकरणात न्यायालयाने अगोदरच तासेरे ओढले आहे तरी पोलीस प्रशासनाने वाळुंज येथील प्रकरणांमध्ये तात्काळ लक्ष देऊन दोषी आरोपींना तात्काळ ताब्यात घेऊन कारवाई करावी नसता सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करणार असल्याचा इशारा ड प्रकाश आंबेडकर यांनी यावेळी बोलताना दिला.यावेळी अनेक पदाधिकारी यांचे आक्रमक पणे भाषणे झाली.या आंदोलनात वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष अशोक हिंगे, राज्य उपाध्यक्ष प्रा किशन चव्हाण,प्रदेश उपाध्यक्ष सर्वजित बनसोडे,अरूण जाधव,विष्णू जाधव,राज्य कायदेशीर सल्लागार ड दिपक शामदिरे, जिल्हाध्यक्ष उद्धव खाडे,अनिल जाधव,युवराज सोनवणे,किरण वाघमारे आदी पदाधिकारी कार्यकर्ते,महिला,पुरूष,युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

योतिर्वृणीत तमसो विजानन् !!
वास्तुशास्त्र एवम रत्न ज्योतिष केंद्र

साप्ताहिक राशी मंथन २९ ते ०४ नोव्हें.२०२३

चरडेशास्त्री
पत्ता =व.राष्ट्रसंत कृषि केंद्र वरचा मजला
कटारीया भवन जवळ वनी रोड वरोरा.
संपर्क –९९७५०४१५३८

मेष:
व्यावसायिक प्राप्ती चांगली राहील. नौकरदारांनी आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे. संततीच्या दृष्टिने शुभ परिणाम. विद्यार्थ्यांना मानसिक दडपण जाणवेल. सरकारी कामात प्रयत्नाने यश मिळेल. पोटाचे विकार त्रास देतील. अविचारी निर्णयातून नुकसान होईल. प्रवासात बेफिकीर राहू नये.
शुभ ता. २९, २, ३.

वृषभ:
उद्योग-व्यवसायात प्राप्ती चांगली राहील. नौकरीमध्ये सहकाऱ्यांची साथ मिळेल. संततीच्या विक्षिप्त आणि गूढ वागण्याचा त्रास होईल. विद्यार्थ्यांची स्थिती गोंधळात्मक राहील. सरकारी कामात सफलता मिळेल. बोलण्यातून वादाचे प्रसंग उद्भवतील. कफाचे विकारांपासून काळजी घ्यावी. प्रवासामधून नियोजित कामे होतील.
शुभ ता. ३०, ३१, १, ४.

मिथुन:
व्यावसायिक प्राप्ती चांगली राहील. नौकरदारांना बदल जाणवणार नाहीत. संततीबरोबर मतभेदाचे प्रसंग येतील. विद्यार्थ्यांना उतावळेपणा नुकसानकारक. काहीजणांना तीव्र मानसिक दडपण जाणवेल. रक्तदाब असणाऱ्यांनी काळजी घ्यावी. सरकारी कामात अडचणी येतील. वडिलांच्या बाबतीत अनपेक्षित अडचणी.
शुभ ता. २, ३.

कर्क:
उद्योग-व्यवसायात आवक चांगली राहील. नौकरीमध्ये कामाचा तणाव जाणवेल. संततीच्या बाबतीत अनपेक्षित अडचणी येतील. विद्यार्थ्यांना संमिश्र यश मिळेल. कौटुंबिक वातावरण तणावाचे राहील. स्थावरावरुन वादाचे प्रसंग येतील. सरकारी कामात अडचणी येतील. भावंडांच्या बाबतीत विचित्र समस्या उद्भवतील.
शुभ ता. २९, ३०, ३१, १, ४.

सिंह:
व्यावसायिक आवक चांगली राहील. नौकरीमध्ये नियोजित कामात सफलता मिळेल. भावंडांच्या वागण्यामुळे मनस्तापाचे प्रसंग. संततीच्या बाबतीत चांगल्या संधी येतील. विद्यार्थ्यांना मनाप्रमाणे यश मिळेल. सरकारी कामात सफलता मिळेल. कौटुंबिक तणाव वाढतील. प्रवासात सर्व दृष्टिने काळजी घ्यावी.
शुभ ता. ३०, ३१, १, २, ३.

कन्या:
उद्योग-व्यवसायात प्राप्ती समाधानकारक राहील. नौकरीमध्ये मनाविरुद्ध जबाबदारी बोलण्यातून वादाचे प्रसंग निर्माण होतील. जोडीदाराला अपघाताचे भय राहील. संततीच्या बाबतीत नव्या संधी येतील. विद्यार्थ्यांना खूप परिश्रम घ्यावे लागतील. सरकारी कामात प्रयत्नाने यश मिळेल. डोळ्यांची पूर्ण काळजी घ्यावी. शुभ ता. २, ३, ४.

तूळ:
व्यावसायिक आवक चांगली राहील. नौकरीमध्ये मानसिक अस्वस्थता जाणवेल. रागांमध्ये कृती करणे टाळावे. संततीच्या समस्येतून योग्य मार्ग निघतील. विद्यार्थ्यांना मनाप्रमाणे यश मिळेल. सरकारी कामात प्रयत्नाने यश मिळेल. प्रवासामधून नियोजित कामे होतील. मित्र-मंडळींची साथ चांगली राहील.
शुभ ता. २९, ४.

वृश्चिक:
व्यवसायात प्राप्ती समाधानकारक राहील. नौकरीमध्ये मनाविरुद्ध घटना. संततीच्या बाबतीत संमिश्र परिणाम मिळतील. विद्यार्थ्यांना मनाप्रमाणे यश. अकारण वादातून मनस्तापाचे प्रसंग येतील. पोटाचे विकारांपासून त्रास. सासुरवाडीत अनपेक्षित समस्या. मित्रांबरोबर किरकोळ गोष्टींतून वाद.
शुभ ता. २९, ३०, ३१, १.

धनु:
व्यावसायिक प्राप्ती चांगली राहील. नौकरीमध्ये समाधानकारक घटना घडतील. जोडीदाराबरोबर वादाचे प्रसंग येतील. संततीच्या बाबतीत अनपेक्षित अडचणी. विद्यार्थ्यांना मनाप्रमाणे यश मिळेल. सरकारी कामात सफलता मिळेल. मोठ्या भावंडांशी वादाचे प्रसंग येतील. प्रवासामधून संमिश्र सफलता मिळेल.
शुभ ता. ३०, ३१, १, २, ३.

मकर:
उद्योग-व्यवसायात प्राप्ती चांगली राहील. नौकरीमध्ये वरिष्ठांमुळे मनस्ताप. संततीच्या बाबतीत शुभ परिणाम. विद्यार्थ्यांना मनाप्रमाणे यश मिळेल. सरकारी कामात सफलता मिळेल. पोटाचे विकारांपासून काळजी घ्यावी. प्रवासात काळजी घ्यावी. मित्र-मंडळींना सहकार्याचे प्रसंग येतील.
शुभ ता. २, ३, ४.

कुंभ:
व्यावसायिक आवक कमी राहील. नौकरीमध्ये मनाविरुद्ध तडजोडीचे प्रसंग येतील. संततीच्या बाबतीत समस्या तीव्र होतील. विद्यार्थ्यांना मनाप्रमाणे यश मिळेल. सरकारी कामात प्रयत्नाने यश मिळेल. वडिलधाऱ्यांसाठी वेळ द्यावा लागेल. प्रवासात अडचणी निर्माण होतील. मित्र-मंडळींचे उत्तम सहकार्य राहील.
शुभ ता. २९, ४.

मीन:
उद्योग-व्यवसायात आवक चांगली राहणार नाही. नौकरीमध्ये अनपेक्षित अडचणी. आर्थिक नियोजनात अडचणी. जोडीदाराबरोबर वादाचे प्रसंग येतील. संततीच्या बाबतीत शुभ परिणाम. विद्यार्थ्यांना मनाप्रमाणे यश मिळेल. प्रवासामधून कामे यशस्वी होतील. वाहनांपासून काळजी घ्यावी. तब्येतीचे त्रास. शुभ ता. ३०, ३१. १.

शुभमस्तु

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचारी राज्यव्यापी आक्रोश आंदोलनात होणार सहभागी

कंत्राटी कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन

गडचिरोली । प्रतिनिधी

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत गेल्या १७ वर्षापासून कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांनी दिनांक २५ ऑक्टोबर २०२३ पासून कामबंद आंदोलन पुकारलेले असून दिनांक ३० व ३१ ऑक्टोबर २०२३ रोजी आझाद मैदान, मुंबई येथे राज्यव्यापी आक्रोश आंदोलनात जिल्हयातील कार्यरत सर्व कर्मचारी हे सहभागी होणार आहेत. माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये उच्च न्यायालयाच्या औरगांबाद खंडपिठाने शासनाची कानउघाडणी करतांना कोणत्याही प्रकल्पाकरिता विहित मुदत असते. परंतू राष्ट्रीय आरोग्य अभियान हे गेल्या १८ वर्षापासून राज्यात सुरु असून तेव्हापासून मोठया प्रमाणात कंत्राटी पद्धतीने कर्मचारी नेमून त्यांचेकरवी कामकाज व आरोग्य सेवा करण्यात येत आहे. इतक्या वर्षापासून कर्मचारी करार तत्वावर ठेवण्याचे कारण काय? अशी विचारणा करुन सदर कर्मचारी यांना शासन सेवेमध्ये दिनांक ३१ मार्च २०२३ पुर्वी सामावून घेण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याचे आदेश राज्य शासनाला दिले. त्याचबरोबर अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे वेळी विविध विधानसभा सदस्यांनी लक्षवेधी व तारांकित प्रश्न उपस्थित करुन अभियानांतर्गत अधिकारी व कर्मचारी यांच्या शासन सेवेत समावेशनाबाबत शासनाला विनंती केली असता, त्यावर दिनांक २० मार्च २०२३ रोजी उत्तर देतांना आरोग्यमंत्री यांनी सदर अधिकारी व कर्मचारी यांचेबाबतीत शासन सकारात्मक असून दिनांक ३१ मार्च २०२३ पुर्वीच धोरणात्मक निर्णय घेण्याचे शासनाचे वतीने जाहिर केले. परंतू सदर बाबीस ६ महिन्यापेक्षा अधिकचा काळ होऊनही शासन स्तरावरुन कोणतीही हालचाल केलेली नसून उच्च न्यायालयाच्या आदेशाची अवहेलना केल्याचे स्पष्ट झाल्याने राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत महाराष्ट्र राज्यातील कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या विविध संघटना एकत्र येवून राष्ट्रीय आरोग्य अभियान कंत्राटी अधिकारी व कर्मचारी समायोजन कृती समिती स्थापन करुन सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे सरसकट शासन सेवेत समावेशन करावे या न्याय हक्क मागणीला धरुन संपूर्ण महाराष्ट्र भर आंदोलन उभे करण्यात आलेले आहे. त्याचाच भाग म्हणून दिनांक १५ ऑक्टोबर रोजी नागपूर येथे अधिवेशन, दिनांक १६ ऑक्टोबर रोजी संविधान चौक, नागपूर येथे ईशारा मोर्चा, त्यानंतर दिनांक १७ ते २४ ऑक्टोबर पर्यंत असहकार आंदोलन करुन दिनांक २५ ऑक्टोबर पासून संपूर्ण कामबंद आंदोलन सुरु करण्यात आलेले आहे. गडचिरोली जिल्हयात कृती समितीचे वतीने दिनांक २५ ऑक्टोंबर रोजी इंदिरा गांधी चौक ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत हजारो कर्मचारी यांचे उपस्थितीत धडक मोर्चा देण्यात येवून जिल्हा परिषद, गडचिरोली समोर धरणे आंदोलन सुरु करण्यात आलेले आहे. सदर आंदोलन आणखी तीव्र करण्यात येत असून त्याचाच भाग म्हणून दिनांक ३० व ३१ ऑक्टोबर २०२३ रोजी आझाद मैदान, मुंबई येथे आयोजित राज्यव्यापी आक्रोश आंदोलनात जवळपास जिल्हयातील १२०० ते १३०० अधिकारी व कर्मचारी सहभागी होणार असून त्याकरिता सदर अधिकारी व कर्मचारी विविध साधनाने मुंबई करिता रवाना झालेले आहेत. कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांनी आंदोलनाला सुरुवात केलेली असल्याने जिल्हयातील आरोग्य सेवेवर विपरित परिणाम होत असून रुग्णसेवा विस्कळीत झालेली आहे. शासनाच्या नियमित आस्थापनेवर आरोग्य अधिकारी व कर्मचारी यांची बहुसंख्य पदे रिक्त असून कार्यरत मोजक्याच अधिकारी व कर्मचारी यांचेवर कामाचा ताण पडत असल्याचे दिसून येत आहे. कृती समितीचे वतीने आयोजित सदर आंदोलनास महाराष्ट्र राज्य राजपत्रीत वैद्यकिय अधिकारी संघटना (मॅग्मो), राज्य शासकिय कर्मचारी संघटना, जिल्हा परिषद आरोग्य कर्मचारी संघटना, विविध नर्सेस संघटना, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी संघटना, औषध निर्माण अधिकारी संघटना तसेच इतरही संघटना यांनी जाहिर पाठिंबा दिलेला असून कृती समितीच्या मागण्या मान्य न झाल्यास आंदोलनात संक्रिय सहभागी होत असल्याचा शासनास इशारा देण्यात आलेला आहे.

अशे कसे
नाही, पेंशनवाले
राहत

जोपर्यंत शासन धोरणात्मक निर्णय घेवून अभियानांतर्गत आरोग्य अधिकारी व कर्मचारी यांचे सेवेत समायोजन करणार नाही, तोपर्यंत कृती समितीचे आंदोलन बंद करणार नाही. लवकरात लवकर समायोजनाबाबत शासन स्तरावरुन ठोस पाऊल न उचलल्यास आंदोलनातील कर्मचारी आत्मदहन करण्यावर ठाम आहेत. – निलेश सुभेदार, मुख्य समन्वयक, राष्ट्रीय आरोग्य अभियान कंत्राटी अधिकारी व कर्मचारी समायोजन कृती समिती, गडचिरोली.

आंदोलनामुळे जिल्हयातील आरोग्य सेवा विस्कळीत झालेली असतांनाही अधिकारी वर्ग आरोग्यसेवा सुरळीत असल्याचे सांगत आहेत. परंतू वस्तुस्थिती ही वेगळीच असून त्याचा प्रत्यय रुग्णालयात गेल्यावरच दिसून येतो. त्यामुळे शासनाने लवकरात लवकर मागण्या मान्य कराव्यात. – गिरीश लेनगुरे, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी (आंदोलक).

जिल्हयातील रुग्णांना वेठीस धरण्याचा कृती समितीचा कोणताही हेतु नाही, परंतू गेल्या १७ वर्षापासून शासन स्तरावरुन नेहमीच अभियानांतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचे शासन सेवेत समावेशनाबाबत चालढकल सुरु आहे. त्यामुळे शासनाने त्वरीत धोरणात्मक निर्णय घेवून कृती समितीची मागणी मान्य करुन कर्मचारी यांना योग्य न्याय द्यावा. – जितेंद्र कोटगले, मुख्य समन्वयक, राष्ट्रीय आरोग्य अभियान कंत्राटी अधिकारी व कर्मचारी समायोजन कृती समिती, गडचिरोली.

मराठा बांधवानी थोडे संयमाने घ्या:मंत्री,नेत्यांनी घरात बसून प्रश्न सुटणार नाही-गुलाबराव पाटील

जळगाव–मराठा आरक्षणाबाबत सरकारची भूमिका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दसरा मेळाव्यात जाहीर केली आहे. राज्याचा प्रमुख बोलत असतो, त्यावेळी त्यात तथ्य असते. मात्र या गोष्टीला सबुरीने आणि सल्ल्याने घ्यायला हवे. सरकार हे कोणाचाही रोष न येता मार्ग काढून आरक्षण देण्याच्या बाजूने आहे. त्यामुळे मराठा आरक्षण कार्यकर्त्यांनी थोड शांततेने घेऊन सहकार्य करावे, असे आवाहन मंत्री गुलाबराव पाटील यांनी मराठा कार्यकर्त्यांना केले आहे.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी राज्यभरात आंदोलन सुरू असून, काही ठिकाणी या आंदोलनाला हिंसक वळण लागल्याचे पाहायला मिळत आहे. गेल्या दोन तीन दिवसांत राज्यभरात नेत्यांना गावबंदीसह तीव्र आंदोलन केले जात आहे. अनेक नेत्यांचा ताफा अडविण्याचा प्रयत्न होत आहे. बसेसची तोडफोड केली जात आहे. यावर गुलाबराव पाटील यांच्यासह मंत्री अनिल पाटील यांनी मराठा बांधवाना सबुरीने घेण्याचा सल्ला दिला आहे. 'सरकार आरक्षण देण्याच्या बाजूने आहे. कोणालाही नाराज न करता टिकणारे आरक्षण पाहिजे असेल तर थोड संयमाने घ्यायला हवे, अशा प्रकारची भूमिका मंत्री गुलाबराव पाटील आणि मंत्री अनिल पाटील यांनी म्हटले आहे. मराठा आरक्षणाबाबत सरकारची भूमिका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दसरा मेळाव्यात जाहीर केली आहे. राज्याचा प्रमुख बोलत असतो, त्यावेळी त्यात तथ्य असते. मात्र या गोष्टीला सबुरीने आणि सल्ल्याने घ्यायला हवे. सरकार हे कोणाचाही रोष न येता मार्ग काढून आरक्षण देण्याच्या बाजूने आहे. त्यामुळे मराठा आरक्षण कार्यकर्त्यांनी थोड शांततेने घेऊन सहकार्य करावे, असे मंत्री गुलाबराव पाटील यांनी मराठा कार्यकर्त्यांना आवाहन दिले आहे. गाव बंदी करण्याची मराठा कार्यकर्त्यांची भावना आहे. त्याचा आम्ही आदर करतो, मात्र मुख्यमंत्री यांच्यावर विश्वास ठेवावा, असं ही गुलाबराव पाटील यांनी म्हटल आहे. केळी पीकविमाबाबत शेतकरी नाराज असले तरी राज्य सरकारने आपला वाटा भरला आहे. दिवाळीपर्यंत केळी पीक विमा रक्कम मिळेल अस सांगत मंत्री गुलाबराव पाटील यांनी सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे, असं म्हटल आहे. कोळी समाज विविध मागण्या संदर्भात बऱ्यापैकी तोडगा निघाला आहे. अजून काही चर्चा बाकी आहे. आज उद्यापर्यंत त्यातून मार्ग निघेल, अस ही मंत्री गुलाबराव पाटील यांनी म्हटल आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवारांना झाला डेंग्यू:प्रफूल्ल पटेल यांनी दिली माहिती

मुंबई–उपमुख्यमंत्री अजित पवार यांना डेंग्यूची लागण झाली आहे. खासदार प्रफुल्ल पटेल यांनी ट्विट करत ही माहिती दिली. आजित पवार गेल्या दोन दिवसांपासून सार्वजनिक कार्यक्रमात दिसत नसल्याने पुन्हा एकदा त्यांच्या नाराजीची चर्चा सुरू झाली होती. या चर्चांना उत्तर देताना प्रफुल्ल पटेलांनी हे ट्वीट केले आहे.ट्विटमध्ये प्रफुल्ल पटेल यांनी म्हटले आहे की, अजित पवार सार्वजनिक कार्यक्रमांना उपस्थित राहत नसल्याच्या बातम्या देत प्रसारमाध्यमांकडून काही अंदाज वर्तवले जात आहेत. मात्र मी हे स्पष्ट करू इच्छितो की कालच अजितदादांना डेंग्यूचे निदान झाले आहे. पुढील काही दिवस त्यांना वैद्यकीय देखरेखीखाली ठेवण्यात आले आहे. त्यांना काही दिवस विश्रांतीचा सल्ला देण्यात आला आहे. त्यामुळे ते सार्वजनिक कार्यक्रमांत पुढील काही दिवस दिसणार नाहीत

अमिर्झा जंगलातील वाघाच्या शिकारप्रकरणी ६ जणांना अटक

गडचिरोली । प्रतिनिधी

जिल्ह्यातील अमिर्झा जंगलात झालेल्या वाघ शिकार प्रकरणी ६ जणांना अटक करण्यात आली आहे . शेतपिके वाचविताना रानडुकरांचा बंदोबस्त करण्यासाठी शेतकऱ्यांनी कुंपणात वीजप्रवाह जोडला होता. या विजेच्या धक्क्याने वाघाचा मृत्यू झाला होता . याची माहिती वनविभागाला देण्याऐवजी ग्रामस्थांनी विविध शस्त्रांनी पंजे – जबडा आणि मिशा कापून या वाघाचे सर्व अवयव लपविले. मात्र , शिकारीची माहिती मिळताच वनविभागाने जाळे पसरविले . यात चौकशी दरम्यान ६ ग्रामस्थांना ताब्यात घेत त्यांच्याकडून नखे , दातआणि मिशांसह शस्त्रे जप्त करण्यात आली .

अनिषा डोहे यांना मराठी विषयात आचार्य पदवी

कोरपना । प्रतिनिधी

गडचांदूर येथील अनिषा दादाजी डोहे यांना मराठी विषयात गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली तर्फे मराठी विषयात आचार्य (पीएच.डी) पदवी प्रदान करण्यात आली. त्यांनी उपरा, उचल्या, गबाळ, कोल्हाटयाचं पोर : एक वाङ्मयीन अभ्यास' या विषयावर प्रबंध सादर केला होता. त्यांना डॉ. इसादास भडके यांचे मार्गदर्शन लाभले. संशोधन कार्यात त्यांचे पती प्रशांत चौधरी, मुलगा ध्रुव मुलगी सान्वी यांचे सहकार्य लाभले.

स्वार्थाच्या राजकारणामुळे विसरलेली जात पुन्हा वर येत आहे:राज्याचे उच्च-तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील

पुणे–आज महाराष्ट्रातील सामाजिक आणि राजकीय स्थिती जातीपातीमुळे विस्कटत चालली आहे. संत - महंतांनी जातीची जी विण विणली होती, ती आता विस्कटत आहे. प्रबोधन आणि विकासामुळे मनातून गेलेली जात ही केवळ स्वार्थाच्या राजकारणामुळे पुन्हा वर येत आहे, असे मत राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले.आम्ही सारे ब्राह्मण आणि ब्राह्मण व्यावसायिक पत्रिका तर्फे मागील सुमारे २२५ वर्षांमध्ये विविध क्षेत्रांमध्ये उत्तुंग कामगिरी करणा-या कर्तृत्त्ववान अशा ७०० हून अधिक राष्ट्रकायासाठी समर्पित ब्राह्मण व्यक्तिमत्वांचा समावेश असलेला १२०० पानांचा 'ब्राह्मण रत्ने' हा चरित्रकोश ग्रंथ साकारण्यात आला आहे. बालगंधर्व रंगमंदिरात ग्रंथांचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी, विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर, माजी आमदार मेधा कुलकर्णी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

'ब्राह्मण रत्ने' ग्रंथ प्रकाशन सोहळा

ग्रंथाच्या संपादक मंडळाचे सदस्य असलेले ज्येष्ठ अभिनेते राहुल सोलापूरकर, प्रकल्प संचालक गोविंद हर्डीकर, संजय ओर्पे व ग्रंथाचे संपादक भालचंद्र कुलकर्णी यावेळी उपस्थित होते. श्रीमंत पेशवे घराण्याचे वंशज आणि लोकमान्य टिळकांचे वंशज यांचा कार्यक्रमात विशेष सत्कार करण्यात आला.चंद्रकांत पाटील म्हणाले, जातीपातीचे राजकारण थांबवण्यासाठी आपण सर्वांनी जातीच्या वर येत सगळ्यांचा विकास ही ईश्वराची पूजा आहे, असा विचार करायला हवा. या प्रयत्नात आपण कमी पडलो तर खूप कटुता निर्माण होईल.परमेश्वराने आपल्यामध्ये भेद निर्माण केला नाही. सगळ्यांना एकसारख्याच पद्धतीने पाठवले. परंतु वेगळेपणा आणि भेद आपण निर्माण करून आपण परमेश्वरापेक्षा पण मोठे निघालो. मनामध्ये जाती विषय कोणताही न्यूनगंड निर्माण न करता विकासाच्या कामात सहभागी व्हावे. दखल न घेतल्यामुळे मुले परदेशी जातात, असा एकूण भाव पाहायला मिळतो, परंतु असे करणे हे विकासाला अडसर ठरेल. त्यामुळे येत्या काळात मोठ्या मनाची भूमिका घ्यायला पाहिजे. आपल्या विकासातील जाती व्यवस्थेचा अडसर दूर करायला हवा, असेही त्यांनी सांगितले.अविनाश धर्माधिकारी म्हणाले, राजकीय स्वार्थामुळे पद्धशीरपणे ब्राह्मण द्वेष पसरविला जातो. फुले , शाहू आंबेडकरांचे नाव महाराष्ट्रात घेतले जाते, परंतु त्यांच्या सोबतचे अनेक जण ब्राह्मण होते. आताच्या भारत आणि महाराष्ट्रामध्ये जाणून बुजून एका विशिष्ट वैचारिक समीकरणाची जोपासना केली जाते. हिंदू द्वेष म्हणजे सेक्युलर वाद आणि ब्राह्मण द्वेष म्हणजे पुरोगामित्व. अशावेळी तर्कशुध्द अभ्यास करून सगळ्यांना सोबत घेऊन जाणे, असे ब्राम्हण समाजाने पुढे जायला पाहिजे. तर्कशुध्द विचारांनी सत्य सांगितले तर द्वेषाचा पराभव होईल. ब्राह्मण असणे ही शुद्ध सात्विक चारित्र्याची जोपासना आहे. त्यामुळे समाजाचे कल्याण होईल

नागरी भागातील आदिवासी बांधवांना शबरी घरकुल योजनेचा लाभ मिळावा वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांची मागणी

ग्रामीण भागाप्रमाणे शहरी भागालाही लक्षांक ठरवून देण्याची आवश्यकता

चंद्रपूर । प्रतिनिधी

आदिवासी समुदायायासाठी असलेली शबरी घरकुल योजना ही ग्रामीण भागात सुरू होती पण या योजनेचा लाभ नागरी भागातील आदिवासी बांधवांना होत नव्हता. ही बाब लक्ष्यात घेत राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी आदिवासी विकास मंत्री यांना नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकडूनच शबरी आदिवासी घरकुल योजने अंतर्गत घरकुले मंजूर करण्यात यावी अशी सविस्तर पत्र लिहत मागणी केली आहे.

शबरी आदिवासी घरकुल आवास योजनेची कार्यपध्दती तयार करण्यात आली आहे. त्यामध्ये ग्रामविकास विभागाची इंदिरा आवास योजना, गृह निर्माण विभागाची घरकुल योजना आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची रमाई घरकुल योजना आदींची अंमलबजावणी शहरी व ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून करण्यात येते. मात्र आदिवासी विभागाची शबरी घरकुल आवास योजना मात्र नागरी स्वराज्य संस्थांच्या अखत्यारीत देण्यात आलेली नाही. ग्रामीण भागात शबरी आदिवासी घरकुल योजना ग्रामीण स्वराज्य संस्था राबवत आहेत. परंतु शहरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्था शबरी आदिवासी घरकुल योजना राबवत नाहीत. त्यामुळे शहरी भागातही नगर पंचायत, नगर परिषद, महानगरपालिका क्षेत्रात शबरी आदिवासी घरकुल योजना राबविण्याची जबाबदारी ही नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सोपविण्याची आवश्यकता आहे, याकडे ना. सुधीर मुनगंटीवार यांनी पत्रातून लक्ष वेधले आहे. चंद्रपूर जिल्ह्यात अनुसूचित जमातीची जवळपास ९ टक्के लोकसंख्या शहरी भागात वास्तव्यास आहे. शहरी भागात राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री आवास योजनेचा लक्षांक हा अपुरा असतो. ग्रामीण भागाप्रमाणे शहरी भागालाही लक्षांक ठरवून देण्याची आवश्यकता असल्याचे ना. सुधीर मुनगंटीवार यांनी पत्रात म्हटले आहे.शहरी भागात रमाई आवास योजनेसाठी गठीत असलेल्या समितीनुसार शबरी आवास (शहरी) योजनेसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात यावी, तसेच या समितीमध्ये सदस्य सचिव म्हणून संबधित जिल्ह्याचे प्रकल्प अधिकारी असावेत, शबरी आवास योजनेचा लक्षांक निश्चित करताना ग्रामीण व शहरी लोकसंख्येनुसार वेगवेगळे लक्षांक निश्चित करण्यात यावेत, अशाही सूचना ना. सुधीर मुनगंटीवार यांनी या पत्राद्वारे केल्या आहेत

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .